# ज्ञानाचा खजिना पाहणे आता अधिक सुलभ

## 'मराठी विश्वकोश ॲप'चे लोकार्पण

विश्वास पवार, वाई

**मराठी विश्वकोश** आता 'मोबाइल ॲप'वर उपलब्ध झाला आहे. वाईमध्ये मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांच्या हस्ते 'मराठी विश्वकोश' नावाच्या या 'ॲप'चे आज लोकार्पण झाले. यामुळे मराठी भाषेतील हा ज्ञानाचा खजिना आता जगभरातील अभ्यासकांना अधिक सुलभतेने खुला होणार आहे.

मराठी विश्वकोश म्हटले, की ते भल्या मोठ्या आकार-वजनाचे ग्रंथ डोळ्यांपुढे येतात. विश्वाचा सारा पसारा या विश्वकोशाच्या २० खंडांमध्ये सामावलेला आहे. पण प्रचंड मोठा आकार आणि वजन आणि पुन्हा असे तब्बल २० खंड सांभाळणे, हाताळणे, त्यातील माहितीचा शोध घेणे या साऱ्याला काही मर्यादा होत्या. याचाच विचार करत तंत्रज्ञानात जसजसे बदल होत गेले तसे मराठीतील हे धन नवनव्या माध्यमांतून वाचकांपुढे येत गेले. सुरुवातीला संगणकावर, नंतर 'सी डॅक'च्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर हे कोश उपलब्ध झाले. पुढे या सर्व खंडांच्या 'सीडी' निघाल्या. मग 'पेन ड्राइव्ह'वर उपलब्ध झाले. आणि आता हा मोठाल्या ग्रंथांचा प्रवास केवळ आपल्या हातातील मोबाईलवर आला आहे, मंडळाच्या वतीने हे सर्व ज्ञानाचे भांडार आता 'मराठी विश्वकोश ॲप'वर पाहण्याची सुविधा निर्माण केली आहे.

'बुकगंगा डॉट कॉम' या ग्रंथक्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेने हे 'ॲप' तयार केले आहे. या 'ॲप'चे लोकार्पण आज विश्वकोश महामंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांच्या हस्ते झाले. 'मराठी विश्वकोश' या नावाचे हे 'ॲप' 'गुगल प्ले स्टोअर'वरून वाचकांना विनामूल्य 'डाऊनलोड' करता येणार आहे. या नव्या तंत्रामुळे विश्वकोशाचे वीस खंड, १५१ विषय, ३१२ सूची, १८ हजार १६३ लेख असे भलेमोठे ज्ञानभांडार आता केवळ मोबाइलवर लोकांना सहज उपलब्ध होणार आहे. विषय, शीर्षक, खंड आदीनुसार या माहितीचा शोध घेता येणार आहे.

हा खजिना मराठी वाचकांबरोबरच मराठी भाषेवर काम करणाऱ्या जगभरातील अभ्यासकांना उपयुक्त पडेल. 'अँड्राइड', 'आय फोन झिंगल' या प्रमुख मोबाइल प्रणालीमध्ये हे 'ॲप' वापरता येणे शक्य आहे. या 'ॲप'वर विश्वकोशाच्या सगळ्या नोंदी बघता येऊ शकतात. मराठी विश्वकोशाचे समृद्ध ग्रंथभांडार हे त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांच्या अपार मेहनतीने तयार झाले आहे. इथल्या नोंदी विद्वानांकडून पुनःपुन्हा तपासून घेतलेल्या आहेत. त्याला माहितीची अधिग्राह्यता मिळाल्याने नोंदींना प्राथमिक संदर्भमूल्य आहे. नेमक्या आणि वस्तुनिष्ठ पद्धतीने हे लेखन झालेले आहे. हा मराठी भाषेचा मोठा वारसा असून आता या 'ॲप'च्या रूपाने तो जगभरातील वाचक, अभ्यासकांसमोर येत आहे.






### वाचक, अभ्यासकांना फायदा

विश्वकोशाच्या वीस खंडांमध्ये प्रयत्नपूर्वक जी माहिती संकलित आणि संपादित केली आहे ती कोणाही व्यक्तीला सहजपणे उपलब्ध व्हावी यासाठी हे 'ॲप' बनवले आहे. याचा वाचक, अभ्यासकांना मोठा फायदा होईल. हे 'ॲप' बुकगंगा संस्थेने सामाजिक जाणिवेतून विनामूल्य उपलब्ध करून दिले आहे.

- दिलीप करंबेळकर, अध्यक्ष, प्रमुख संपादक, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

### 'ऑडिओ बुक'साठी प्रयत्न

सध्या मराठी वाचन कमी होत असून इंग्रजी माध्यमाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढतो आहे. अशा वेळी मराठी भाषेतील हा ज्ञानाचा खजिना नव्या पिढीला त्यांच्या माध्यमात उपलब्ध व्हावा यासाठी हे 'ॲप' तयार केले आहे. यापुढे 'ऑडिओ बुक' स्वरूपात हे कोश उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. 'बुकगंगा' त्या दृष्टीने प्रयत्न करत आहे.

- मंदार जोगळेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, बुकगंगा.कॉम